दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक २६४ | MAHMAR/2006/17212 | रायगड | सोमवार, दि.२२ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## २२ डिसेंबरचा मोर्चा स्थगित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी काढण्यात येणारा २२ डिसेंबरचा मोर्चा स्थगित करण्यात आलू असल्याची माहिती २७ गाव प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील यांनी दिली आहे.

२५ डिसेंबर रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमान उड्डाण होणार आहे. मात्र अद्यापही या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव दिलेले नाही. त्यामुळे भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, शेतकरी, दिबाप्रेमी नाराज आहेत. नवी मुंबईतून विमान उड्डाण होण्यापूर्वी २२ डिसेंबर रोजी विराट मोर्चा काढण्यात येणार होता. या मोर्चाची तयारी देखील झाली होती. २७ गाव प्रकल्पग्रस्त समितीच्या माध्यमातून पनवेलमधील हजारो नागरिक यात सहभागी होणार होते. खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या माध्यमातून या आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र आचारसंहितेमुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली आहे. यापुढे आचारसंहिता संपल्यानंतर विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती नंदराज मुंगाजी यांनी दिली.

### भाजपची उरण नगर परिषदेतील सत्ता महाविकास आघाडीने केली हस्तगत

# उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भावना घाणेकर विजयी

**दै.रायगड नगरी । उरण**

२ डिसेंबरला उरण नगर परिषदेच्या पार पाडण्यात आलेल्या नगराध्यक्ष व १० प्रभागातील नगरसेवकांच्या २१ जागांसाठी पार पडलेल्या निकालाची उच्छुकता सर्वांनाचा लागली होती. काल रविवारी २१ डिसेंबर रोजी झालेल्या उरण नगरपरिषदेच्या मतमोजणीत नगराध्यक्षपदी महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर या १ हजार ४७० मतांच्या फरकांनी विजयी झाल्या आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नागराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांना ९ हजार २१० मते तर भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या पराभूत उमेदवार शोभा शाह – कोळी यांना ७ हजार ७४० मते मिळाली आहेत. तर शिवसेना शिंदे गटाच्या



उमेदवार रुपाली ठाकूर यांना अवघी ५९३ मते मिळाली आहेत.

त्याचप्रमाणे उरण नगर परिषदेच्या एकूण २१ नगर सेवकांपैकी भाजपाला १२ तर महाविकास आघाडीने ९ जागा जिंकल्या आहेत. प्रभाग क्रमांक १ अ मधून भाजपच्या रजनी सुनिल कोळी(विजयी)१ ब मधून भाजपाचे जविन्द्र लक्ष्मण कोळी(विजयी) प्रभाग क्रमांक २ अ रिबेका रवींद्र मढवी(विजयी)२ ब मधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे चे विक्रम राजेंद्र म्हात्रे(विजयी)३ अ मधून ठाकरे गटाच्या वंदना विजय पवार(विजयी) ३ ब मधून ठाकरे गटाचे अमित हरिश्चंद्र म्हात्रे(विजयी)४ अ मधून ठाकरे गटाचे अतुल सुरेश ठाकूर(विजयी) ४ ब मधून ठाकरे गटाच्या प्रमिला संतोष पवार(विजयी)५ अ मधून काँग्रेसच्या नाहिदा ठाकूर(विजयी) ५ ब मधून भाजपचे जसीम इस्माईल गॅस(विजयी)६ अ मधून ठाकरे गटाचे मंगेश लक्ष्मण कासारे(विजयी),६ ब मधून ठाकरे गटाच्या तनीषा सागर पाटील(विजयी),७ अ मधून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रार्थना चेतन म्हात्रे(विजयी)७ ब मधून भाजपाचे रवी यशवंत भोईर(विजयी)८ अ भाजपच्या पूर्वा योगेश वैवडे( विजयी)८ ब भाजपचे ऍड. रोहित नितीन पाटील(विजयी)९अ भाजपचे गणेश सदाशिव पाटील(विजयी) ९ ब भाजपच्या सायली विशाल पाटेकर(विजयी),१० अ भाजपा राजेश मधुकर ठाकूर(विजयी),१० ब भाजपाच्या सायली सविन म्हात्रे(विजयी),१० क मधून भाजपच्या दमयंती वैभव म्हात्रे (विजयी) झाल्या आहेत. एकंदरीत उरण नगर परिषदेच्या या निवडणुकीत उरण शहरातील मतदारांनी यापूर्वी सत्तेवर असलेल्या सत्ताधाऱ्यांना थेट जनतेतून निवडून दिल्या जाणाऱ्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला घरचा रस्ता दाखविला आहे. उरण शहरातील जनतेसमोर उभ्या ठाकलेल्या विविध समस्यांमुळे महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर यांच्या रूपाने नवा पर्याय दिला आहे.

# श्रीवर्धन नगराध्यक्षपदी शिवसेना (उबाठा) चे अॅड.अतुल चौगुले

### राष्ट्रवादी काँग्रेसचे १५, भाजपचे २, शिंदे गटाचे ३ उमेदवार विजयी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये नाट्यमय परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वांचे अंदाज फोल ठरवत श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या १५ जागा निवडून आलेल्या असल्या तरीही थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये उबाठाचे एडवोकेट अतुल चौगुले यांनी २१९ मतांनी विजय संपादन केला आहे. यावेळी राष्ट्रवादी व भारतीय जनता पार्टी यांची युती असल्यामुळे बरेच वर्षाच्या कालावधीनंतर भारतीय जनता पार्टीचे दोन नगरसेवक श्रीवर्धन नगरपरिषदेवरती निवडून आले आहेत. सुप्रिया चौगुले व प्रणिल बोरकर यांनी भाजपाचे अनेक वर्षानंतर नगरसेवक होण्याचा मान मिळवला आहे.

तर शिवसेना शिंदे गटाकडून देवेंद्र भूसाणे, सलोनी मोहित-भगत व माजी शहर प्रमुख संतोष तथा पिंट्या वेशवीकर यांनी विजय संपादन केला आहे. शिवसेना उबा ठाक कडून एडवोकेट अतुल चौगुले हे विजयी झाल्यानंतर राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत शेठ गोगावले यांनी श्रीवर्धन येथे येऊन अतुल चौगुले यांचे विशेष अभिनंदन केले. त्यानंतर विविध प्रसार माध्यमांवरती एडवोकेट अतुल चौगुले शिंदे गटामध्ये प्रवेश करणार याबाबत वृत्त प्रसिद्ध करण्यात येत होते. परंतु अद्याप अशी कोणत्याही प्रकारची अधिकृत घोषणा झाल्याची माहिती शिवसेना उबाठा




कडून प्राप्त झालेली नाही.

२००९ साली रायगडचे विद्यमान खासदार सुनील तटकरे हे श्रीवर्धन मतदारसंघातून आमदार निवडून आल्यानंतर राज्यामध्ये कॅबिनेट मंत्री होते. तसेच राज्याचे अर्थमंत्री होते. तेव्हापासून सातत्याने श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघांमध्ये व श्रीवर्धन शहरासाठी विविध प्रकारचा विकास निधी आणण्यात आला. त्यामुळे या वेळच्या नगरपरिषद निवडणुकीत थेट नगराध्यक्षाचा उमेदवार देखील राष्ट्रवादी काँग्रेसचाच निवडून येईल व राष्ट्रवादी काँग्रेसची एक हाती सत्ता स्थापन होईल. अशी आशा राष्ट्रवादीच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना होती. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर-सेवक बहुतेक ठिकाणी निवडून आले. परंतु त्याच प्रभागांमधून क्रॉस वोटिंग झाल्यामुळे अतुल चौगुले यांचा विजय झाल्याचे बोलले जात आहे. तसेच येत्या आगामी चार ते पाच दिवसांमध्ये अतुल चौगुले हे देखील शिवसेना शिंदे गटामध्ये अधिकृत प्रवेश करतील. अशा प्रकारच्या चर्चा देखील विविध स्तरावरून ऐकायला मिळत आहेत. एकूणच श्रीवर्धन नगर परिषदेचा निकाल हा नाट्यमय रित्या लागलेला असून आता पुढे काय होते? याविषयी श्रीवर्धनच्या नागरिकांना मोठी उत्सुकता लागून राहिलेली आहे.

## आज रामबाग उद्यानाचा वर्धापनदिन सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुबईतील 'मिरॅकल गार्डन' च्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावे खाडी येथील श्री म्हसेश्वर परिसरात असलेल्या 'रामबाग' या निसर्गरम्य उद्यानाच्या तृतीय वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त सोमवार दिनांक २२ डिसेंबर रोजी श्री. सत्यनारायण महापूजा व सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष निमित्ताने विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी मंत्री व आमदार रवीशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी 'स्वर्गसुख आनंद देणारी रामबाग' साकारली आहे. १४ एकर जागेतील या 'रामबाग' उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या असंख्य विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. सायकांळी या उद्यानाचे रूप बदलते, त्यावेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटणारी आहे. त्यामुळे राज्यातील निसर्गप्रेमी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत आहेत. न्हावेखाडी येथे म्हसेश्वर मंदिर येथे अतिसुंदर असलेल्या या रामबाग उद्यानाच्या वर्धापनदिनानिमित्त सायंकाळी ५. ३० वाजता श्री. सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद तर रात्री ०८ वाजता पप्पू सूर्यराव, स्टेप आर्ट इंटरटेन्मेन्ट निर्मित व सनी संते प्रस्तुत 'हिच खरी आगरी कोळ्यांची दौलत' हा पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार असून प्रवेश विनामूल्य आहे.

# माथेरानच्या नगराध्यक्षपदी चंद्रकांत चौधरी ; शिवसेना-भाजप युतीची सत्ता

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान ।** सात वर्षांच्या प्रतिक्षेनंतर पार पडलेल्या माथेरान नगरपरिषद निवडणुकीच्या निकालाने शहरात आनंद उत्सव सुरु झाला आहे. मतमोजणीची प्रक्रिया सुरू असताना प्रत्येक टप्प्यात चुरस जाणवत होती. एकूण मतदान ३४४५ इतके पार पडले. नोटा मते १७ होती. अखेरीस नगराध्यक्ष पदाच्या लढतीत शिवसेना शिंदे गटाचे चंद्रकांत चौधरी यांना २२५७ मते मिळाली असून तब्बल १०६९ मतांनी विजय मिळवत नगराध्यक्षपद पटकावले.प्रतिस्पर्धी शिवराष्ट्र पॅनेलचे उमेदवार अजय सावंत यांना ११८८ मते मिळाली.

यंदाची निवडणूक अत्यंत महत्वाची ठरली होती. कारण ही निवडणूक शिवसेना-भाजप युतीचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली होती. दुसरीकडे सुधाकर घारे आणि



सुनील तटकरे यांनी शिवराष्ट्र पॅनल उभे करून मोठे राजकीय आव्हान उभे केले होते. या दोन्ही पॅनेलमध्ये चुरस पाहायला मिळाल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष या निवडणुकीकडे वेधले गेले होते. तथापि, निकालाने सर्व तर्कवितर्कांना पूर्णविराम देत शिवसेना-भाजप युतीने नगरपरिषदेत एकहाती सत्ता मिळवली आहे. प्रभागवार ताकद आजमावत शिंदे गट व भाजपच्या उमेदवारांनी बहुतेक जागांवर बाजी मारत स्पष्ट वर्चस्व निर्माण केले.

माथेरान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ निकाल : प्रभाग क्रमांक १ केतन रामाने : शिवसेना शिंदे गट : विजयी अनुसया ढेबे : राष्ट्रवादी अजित पवार गट : विजयी, प्रभाग क्रमांक २ सिताराम कुंभार : राष्ट्रवादी अजित पवार गट : विजयी लता ढेबें : शिवसेना शिंदे गट : विजयी, प्रभाग क्रमांक ३ रिजवाना शेख : शिवसेना शिंदे गट :विजयी शिवाजी शिंदे : शिवसेना शिंदे गट : विजयी, प्रभाग क्र ४ गौरंग वाघेला : शिवसेना शिंदे गट : विजयी, सौ.प्रतिभा घावरे : भाजपा : विजयी, प्रभाग क्र ५ सचिन दाभेकर : शिवसेना ठाकरे गट विजयी कमल गायकवाड : शिवसेना शिंदे गट विजयी, प्रभाग क्र ६ सोहेल महापुळे : शिवसेना शिंदे गट विजयी सौ सुरेखा साळुंखे : शिवसेना शिंदे गट विजयी, प्रभाग क्र ७ संतोष शेलार : भाजपा विजयी अनिता रांजाणे : राष्ट्रवादी अजित पवार गट विजयी, प्रभाग क्रमांक ८ किरण पेमारे : राष्ट्रवादी अजित पवार गट विजयी सौ. अर्चना भिल्लारे : शिवसेना शिंदे गट विजयी, प्रभाग क्रमांक ९ सुनील शिंदे : शिवसेना शिंदे गट विजयी सौ. ऐश्वर्या तोरणे : शिवसेना शिंदे गट विजयी, प्रभाग क्र १० किशोर मोरे : शिवसेना शिंदे गट विजयी प्रियांका कदम : भाजपा विजयी

## महाड हाणामारी प्रकरणातील सर्वांचे अटकपूर्व जामीन फेटाळले

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड नगर परिषदेच्या निवडणुकीदरम्यान २ डिसेंबरला झालेल्या शाळा क्रमांक पाच येथे असलेल्या प्रभाग दोन व तीन मतदान केंद्राबाहेरील रस्त्यावर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारी संदर्भात संबंधित दोन्ही गटातील म्हणजेच विकास गोगावले, सुशांत जाभरेसह एकुण २९ आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज माणगाव कोर्टाने फेटाळल्याची माहिती माणगाव न्यायालयातील सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी दिली आहे.

या संदर्भात दोन्ही गटांविरोधात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर माणगावच्या जिल्हा व्यतिरिक्त सत्र न्यायाधीशांकडे या प्रकरणाची चौकशी मागील दोन आठवड्यापासून सुरू होती. आज या संदर्भात झालेल्या सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षाची बाजू ऐकून घेतल्यानंतर सरकारी वकील आणि केलेल्या युक्तिवाद विचारात घेऊन सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांनी दोन्ही गटातील आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळत असल्याचे जाहीर केले.

# महाविकास आघाडीला पुन्हा फटका ; महायुतीचा करिष्मा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विधानसभा निवडणुकीपाठोपाठ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्येही महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांना फटका बसला आहे. महायुतीच्या तुलनेत महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादीने (शरद पवार) या निवडणुका फारशा प्रतिष्ठेच्या केल्या नव्हत्या.

नगरपालिका किंवा नगरपंचायतींच्या निकालाचा आढावा घेतल्यास राज्याच्या सर्वच भागांमध्ये महायुतीने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. राज्यातील बहुतांशी पालिकांमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना यश मिळाले. काँग्रेसला विदर्भाने पुन्हा हात दिला. शिवसेना ठाकरे गटाबरोबरच राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची पिछेहाट झाली आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात चांगले यश मिळाले होते. राज्यातील ४८ पैकी ३० जागा महाविकास आघाडीने जिंकल्या होत्या. त्यानंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला होता. विधानसभेत महाविकास आघाडीच्या तिन्ही घटक पक्षांना २० आमदारांचा आकडा पार करता आला नव्हता. एवढी दारुण अवस्था महाविकास आघाडीची झाली होती. नगरपालिका निवडणुकीत महायुती बाजी मारणार हे चित्र होते. यानुसारच निकाल लागला आहे.

विधानसभा निवडणूक निकालाची पुनरावृत्ती नगरपालिका निवडणुकांमध्ये झाली आहे. विधानसभा




निवडणुकीनंतर काँग्रेस, शिवसेना ठाकरे किंवा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे मोठ्या प्रमाणावर स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांनी सत्ताधारी पक्षात प्रवेश केला आहे. तरीही लोकांचा पाठिंबा कायम राखण्यात घटक पक्षांना काही प्रमाणात तरी यश मिळाले आहे. विधानसभेच्या तुलनेत काँग्रेसला अधिक यश मिळाले आहे. विशेषत: विदर्भात काँग्रेसला बऱ्यापैकी यश मिळाले. चंद्रपूर जिल्ह्याने काँग्रेसला हात दिला आहे. काँग्रेससाठी तेवढाच दिलासा ठरला आहे.

शरद पवारांना विधानसभेपाठोपाठ नगरपालिका निवडणुकांमध्ये मोठा फटका बसला आहे. राज्याच्या राजकारणात आतापर्यंत शरद पवार यांनी ताकद होती. स्वबळावर ६०च्या आसपास शरद पवारांनी स्वत:च्या ताकदीवर निवडून आणले आहेत. पण विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतून लढताना पवारांच्या पक्षाची पिछेहाट झाली. शरद पवार गटाचे १० आमदारच निवडून आले होते. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतही पवारांच्या पक्षाला दुहेरी आकडा गाठता आलेला नाही. पवारांसाठी हा मोठा धक्का आहे. पुणे, सातारा, सांगली, सोलापूर या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांबरोबरोबरच नाशिक, नगर या उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पवारांचे नेतृत्व मानणारा मोठा वर्ग होता. पण या सर्वच जिल्ह्यांमध्ये पवारांची पिछेहाट झाली. बारामतीमध्ये अजित पवार गटाचा नगराध्यक्ष निवडून आला.

उद्धव ठाकरे यांनी सारे लक्ष हे मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर केंद्रित केले आहे. परिणामी नगरपालिका निवडणुकांची जबाबदारी स्थानिक नेत्यांवर सोपविली होती. ठाकरे यांच्या पक्षाला अपेक्षित यश मिळालेले नाही. कोकणात एकनाथ शिंदे यांनी वर्चस्व प्रस्थापित केले.

# शिल्पांतला 'राम' हरपला

काळाच्या पडद्याआड गेलेल्या कैक उत्तुंग व्यक्तिमत्त्वांना अमरत्व प्राप्त झाले ते त्यांच्या शिल्पांमुळे. निर्जीव छिन्नी-हातोड्यांनाही ज्यांचा परिसस्पर्श लाभला, अशा कैक शिल्पकारांच्या जादुई बोटांचं कौतुक करणारे शब्दही मराठी साहित्यात ओथंबून वाहिले. 'शिल्प साकारलं तुझ्या परिसस्पर्शातुनि... जणू प्राण ओतले तू पाषाणात या..' या सहज सुंदर ओळींची आठवण येते ती थोर शिल्पकार राम सुतारांच्या निर्मितीकडे पाहताना. वयाच्या एकशेएकव्या वर्षी त्यांनी नोएडा येथे बुधवारी शेवटचा श्वास घेतला. 'जगातील सर्वांत उंच पुतळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे ते शिल्पकार; परंतु इतरही अनेक सर्वोच्च उंचीच्या पुतळ्यांचा मान त्यांनाच लाभलेला. अयोध्येत तब्बल ८२३ फूट उंचीच्या श्रीराम मूर्तीचे काम सुरू झाले ते त्यांच्याच मार्गदर्शनाखाली. मुंबईच्या समुद्रातही ६०० फूट उंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम प्रगतिपथावर आहे. मुंबईतीलच इंदू मिलच्या जागेवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ४५० फूट उंचीच्या पुतळ्याचीही तयारी. हा पुतळा जगातील तिसरा उंच पुतळा ठरेल. राम सुतारांनी आयुष्यभर कैक पुतळे उभे केले; परंतु गेल्या दीड वर्षांत सर्वाधिक चर्चा झाली मालवणच्या शिल्पकृतीची. इथल्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवरायांच्या तलवारीसह ८२ फूट उंचीच्या भव्य पुतळ्याची जबाबदारी त्यांच्यावर दिली गेली. काम सुरू झाले डिसेंबर २०२४ मध्ये. काम पूर्णत्वास पोहोचले एप्रिल २०२५ मध्ये. म्हणजे अवघ्या पाच महिन्यांत छत्रपतींच्या दिमाखदार शिल्पकृतीची निर्मिती झाली. ११ मे २०२५ रोजी या पुतळ्याचे लोकार्पणही झाले. ताशी दोनशे किलोमीटर वेगाच्या समुद्री वाऱ्यांनाही तोंड देण्याची ताकद या शिल्पात आहे. मध्य प्रदेशातील ४५ फूट उंच असे चंबल देवीचे भव्य शिल्प त्यांच्या सुरुवातीच्या काळातील एक मास्टरपीस मानले जाते. केवळ जिवंतपणाच नव्हे तर आजूबाजूच्या निसर्गाचा सखोल अभ्यास करून तेवढा मजबूत पुतळा उभारणं, ही खरी हातोटी सुतारांच्या बोटात. जगभरातील शिल्पसृष्टीत स्वतःचं नाव अजरामर करणारे राम सुतार मूळचे महाराष्ट्राचे. धुळे जिल्ह्यातील गोंदूर गावी त्यांचा जन्म. वडील सुतारकाम करायचे. शाळेत खडूने चित्र काढताना त्यांना त्यांच्या गुरुजींनी पाहिले. त्यांच्यातील कलाकार ओळखून गुरुजींनीच वडिलांना शिल्पकलेच्या शिक्षणासाठी प्रवृत्त केले. त्यांनी मुंबईतील प्रसिद्ध जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून शिल्पकलेचे शिक्षण घेतले. पित्यासोबत लाकडावर कोरीव काम करता करता समोर पाषाण कधी आले हेही त्यांना कळलं नाही. त्यांची बहुसंख्य शिल्पं ब्राँझ धातूतली. महात्मा गांधी, पंडित नेहरू, पंडित दीनदयाळ उपाध्याय, रफी महंमद किडवाई यांच्यासह कैक भारतीय नेत्यांची शिल्पे त्यांच्या बोटातून घडली. 'पद्मश्री', 'पद्मभूषण' अन् 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारानं त्यांना सन्मानित केले गेले. शिल्प बनविण्यापूर्वी ते संबंधित व्यक्तीच्या शरीरयष्टीतील बारीक-सारीक बारकावेही अचूक टिपत. सरदार पटेलांच्या शेकडो फोटोंचा अभ्यास केल्यानंतरच त्यांनी त्यांच्या शिल्पनिर्मितीला प्रारंभ केला होता. संबंधित व्यक्तीच्या डोळ्यांतील भाव अन् चेहऱ्यांवरील छटाही शिल्पकृतीत उमटत. 'शिल्प म्हणजे धातूचा तुकडा नसून इतिहासाचा जिवंत पुरावा असतो', यावर त्यांची नितांत श्रद्धा. भारताबाहेरही अनेक देशांत महात्मा गांधींच्या शिल्पांनी सुतारांचे नाव अजरामर केले. जगभरात खरी ओळख मिळाली ती गांधींच्या पुतळ्यामुळेच. संसद भवनातील ध्यानस्थ गांधी मूर्तीच्या चेहऱ्यावरील करुणा अन् दृढता अचूक टिपली ती याच सुतारांनी. त्यांच्या शिल्पकलेची खरी ओळख एकच. ती म्हणजे तंतोतंतपणा. चेहऱ्यावरील सुरकुत्या इतक्याच कपड्याच्या चुण्याही खऱ्या-खुऱ्या वाटत. अचूक शिल्पकलेसाठी बहुसंख्य शिल्पकारांच्या दृष्टीने ते जणू 'श्रद्धेचे विद्यापीठ' होते. हस्तकौशल्याच्या बाबतीत याच कलाकारांसाठी ते जणू देव होते. १९५० च्या दशकात अजिंठा-वेरूळ लेण्यांमधील मूर्तींच्या डागडुजीच्या कामातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या सुतारांनी अवघ्या महाराष्ट्राचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचविले. १९ फेब्रुवारी १९२५चा त्यांचा जन्म. आणखी दोन महिन्यांनी त्यांचा एकशेएकावा वाढदिवस जोरात साजरा करण्याची इच्छा त्यांना मानणाऱ्या अनेक कलाकारांची होती. मात्र, नियतीनं ती अपूर्णच ठेवली. त्यांच्या निधनाने सजीव शिल्पांमधला 'राम' हरपला. 'शिल्पकार तोच असतो, जो दगडातील अनावश्यक भाग काढून टाकतो अन् त्यातून देव प्रकट करतो', याची चिरंतन आठवण करून देणाऱ्या राम सुतारांना विनम्र अभिवादन!

# भगवदगीता आपल्या संस्कृतीचा आत्मा : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भगवद्गीतेत केवळ धार्मिक उपदेश नाही, तर जीवन जगण्याची कला सांगितलेली आहे. कर्तव्य, कर्मयोग, भक्तीयोग आणि ज्ञानयोग यांचा सुंदर समतोल गीतेत दिसतो. कर्तव्य करताना फलाची अपेक्षा न ठेवणे, धैर्याने संकटांना सामोरे जाणे आणि स्वतःचा धर्म ओळखणे हे संदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, त्यामुळे भगवदगीता आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (रविवार, दि. २१) येथे केले.



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल यांच्या वतीने श्रीगुरुकुलम् न्यासतर्फे सप्टेंबर महिन्यात श्री. विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे श्रीमद् भगवद् गीता पाठ महायज्ञ संपन्न झाले. या संस्कारमय कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीमद भगवद गीता पठण स्पर्धेची घोषणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. विशेष म्हणजे पनवेलमध्ये प्रथमच आयोजन करण्यात आलेल्या या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आणि समीरा गुजर - जोशी यांचे प्रकट व्याख्यान शहरातील गोखले सभागृहात झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

यावेळी प्रमुख वक्ता सुप्रसिद्ध अभिनेत्री व सूत्रसंचालिका समीरा गुजर - जोशी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, पनवेल मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अजय बहिरा, राजू सोनी, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका प्रिती जॉर्ज, सुलक्षणा टिळक, संस्कृत भारतीच्या अनया करंदीकर, नीलांबरी जोशी, जुई चव्हाण, गुरुकुलम न्यास अध्यक्ष मंजिरी फडके, ॲड. अमित चव्हाण, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, रुपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, विनायक मुंबईकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह विद्यार्थी, युवा, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत श्रीमद् भगवद्गीता हे ग्रंथरत्न विशेष मानाचे स्थान राखून आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिलेले गीतेतील उपदेश आजही मानवाला सत्य, कर्तव्य, धैर्य आणि आत्मज्ञानाचा मार्ग दाखवतात. या आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रवाहाला नवे तेज देण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून काम केले जात आहे. ही स्पर्धा हा केवळ श्लोक पठणाचा कार्यक्रम नसून, विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात संस्कारांची पेरणी करण्याचा एक सुंदर प्रयत्न असतो. योग्य उच्चारण, छंद, लय आणि भावपूर्ण अभिव्यक्तीद्वारे गीतेचे श्लोक सादर करताना विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती आणि मानसशांती विकसित होते. गीता पठण हे प्राचीन भारतीय वाङ्मयातील संगीतात्मक परंपरेचाही एक भाग आहे. श्लोकांच्या ध्वनीत एक विशिष्ट लय असते, जी मनाला स्थिर ठेवते. त्यामुळे स्पर्धेची तयारी करताना केवळ श्लोक पाठ होतात असे नाही; तर त्यांना संस्कृत भाषेचे सौंदर्य, तिचे व्याकरण आणि ध्वनी माधुर्य यांचाही परिचय होतो. यामुळे त्यांची भाषिक आणि बौद्धिक प्रगती अधिक दृढ होते. त्यामुळे श्रीमद् भगवद्गीता चे महत्व अनन्य साधारण आहे. त्या अनुषंगाने पुढे बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भगवद गीतेचे महत्व आपल्या भाषणातून मांडले. संस्कृत भाषा ज्ञानाची आणि संस्कृतीची आहे. आपल्या देशातील भाषा आणि साहित्य देशाचे वैभव आहे, त्या अनुषंगाने आपली संस्कृती वृद्धिंगत होत राहणे हि आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे नमूद करून भगवद गीतेचे ज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे हा मूळ उद्देश या स्पर्धेचे होते हे त्यांनी अधोरेखित केले. या स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद ऊर्जा देणारा आहे.हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्री गुरुकुलम न्यास यांनी विशेष मेहनत घेतली असल्याचे नमूद करून यापुढेही हि स्पर्धा अखंडपणे सुरु राहिली पाहिजे यासाठी आपण सारे कायम प्रयत्नशील राहू या, असे आवाहन करून स्पर्धक तसेच आयोजन समितीमधील सर्वांना त्यांनी धन्यवाद दिले.

यावेळी वक्ता म्हणून बोलताना समीरा गुजर-जोशी यांनी म्हंटले कि, आपली संस्कृती ही आपल्या ओळखीचा आत्मा आहे आणि ती कधीही विसरता कामा नये. भारत हा बुद्धी, ज्ञान आणि मूल्यांचा देश असून येथे शब्दांचे उच्चार, त्यांचा अर्थ आणि विचारांना विशेष महत्त्व दिले जाते. भारतीय संस्कृती जगभरात तिच्या महान परंपरा, तत्त्वज्ञान आणि जीवन मूल्यांमुळे ओळखली जाते. यशस्वी, संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनासाठी भगवद्गीतेचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. भगवद्गीतेत सांगितलेला कर्मसिद्धांत माणसाला कर्तव्यनिष्ठ राहून, फळाची अपेक्षा न करता कार्य करण्याची प्रेरणा देतो. हा सिद्धांत व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि जीवनातील यशासाठी दिशादर्शक ठरतो. भारतीय संस्कृतीचे जतन आणि भगवद्गीतेतील विचारांचा अंगीकार केल्यास समाज अधिक सुसंस्कृत, विचारशील आणि मूल्याधिष्ठित बनेल, असे सांगून जो घटक संपूर्ण समाजाला एकत्र बांधून ठेवतो, मूल्ये, नैतिकता आणि एकोप्याची भावना निर्माण करतो, त्याला खऱ्या अर्थाने धर्म म्हणता येते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी साने गुरुजी, विनोबा भावे, बहिणाबाई यांचे उदा-हरणे देत भावी व युवा पिढीला सरळ सोप्या भाषेत संवादातून मार्गदर्शन केले. तसेच सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाच्या या स्पर्धेच्या आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभारही व्यक्त केले.

# खोपोली भगवामय, कुलदीपक शेंडे यांचा दणदणीत विजय

## शिंदे गट १४ जागांसह आघाडीवर, राष्ट्रवादीला ७ जागांवर समाधान

**दै.रायगड नगरी । खलील सुर्वे**

**खोपोली ।** खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा निकाल जाहीर होताच शहरात राजकीय चित्र स्पष्ट झाले असून, शिव-सेना - भाजप - आरपीआय महायुतीचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पुरस्कृत परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार, माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील गोटीराम पाटील यांचा १,११८ मतांनी पराभव करीत नगराध्यक्ष पदावर दणदणीत विजय मिळवला. या विजयामुळे खोपोलीत भगवामय वातावरण निर्माण झाले आहे.



या लढतीत काँग्रेसचे तौफिक करजीकर, आम आदमी पार्टीचे डॉ. रियाज पठाण तसेच पत्रकार किशोर साळुंके यांनी मिळून १,६०२ मते घेतली. याशिवाय ऋषिकेश कोंडुसकर (२७३) आणि पत्रकार अनिल वाघमारे (३१८) यांनाही लक्षणीय मते मिळाली. या मतविभाजनामुळे मुख्य लढतीतील मतांतील अंतर वाढल्याचे चित्र दिसून आले. दिग्गजांना पराभवाचा धक्का :- या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. सुनील पाटील यांच्यासह माजी नगराध्यक्ष दत्त-त्रेय मसुरकर, माजी नगरसेवक किशोर पानसरे, जीनी सॅम्युअल आदी दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. शरद पवार गटाचे खाते सुवर्णा मोरे यांच्या विजयामुळे उघडले, तर राहुल गायकवाड हे एकमेव अपक्ष नगरसेवक ठरले.

प्रचारयंत्रणा आणि नेतृत्व :- महायुतीचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांच्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध आणि आक्रमक प्रचारयंत्रणा उभी केली. बूथनिहाय व्यूहरचना, मतदारांशी थेट संपर्क आणि संघटनात्मक ताकद यांचा पुरेपूर वापर या विजयामागे निर्णायक ठरला. याउलट, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांची ही प्रतिष्ठेची निवडणूक असतानाही प्रचारातील विस्कळीतपणा व नियोजनाचा अभाव मतदारांच्या नजरेतून सुटला नाही, अशी प्रतिक्रिया शहरात उमटली.

मतदानाचा आढावा :- खोपोली शहरात एकूण ६२,०७४ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी ४२,४४८ मतदारांनी नगराध्यक्षपदासाठी मतदानाचा हक्क बजावला. विजयी उमेदवार - प्रभागनिहाय (संक्षेप) :- प्रभाग १ : मंगेश दळवी (राष्ट्रवादी), श्रुती पालांडे (शिवसेना-शिंदे) प्रभाग २ : अमित फाळे, मानसी काळोखे (दोन्ही शिवसेना शिंदे) प्रभाग ३ : सुवर्णा मोरे (शरद पवार गट), अनिल सानप (शिवसेना शिंदे) प्रभाग ४ : विनायक तेलवणे (राष्ट्रवादी), प्रतिक्षा रेटरेकर (भाजप) प्रभाग ५ : हर्षदा गायकवाड, समीर मसुरकर (राष्ट्रवादी) प्रभाग ६ : मयुरी शेलार (शिवसेना शिंदे), राहुल गायकवाड (अपक्ष) प्रभाग ७ : ऐश्वर्या पाटील, प्रशांत शेंडे (दोन्ही राष्ट्रवादी) प्रभाग ८ : रुपाली जाधव, रुकसाना जळगावकर (दोन्ही शिवसेना शिंदे) प्रभाग ९ : गणेश सुतक, तसलीम पाटील (दोन्ही शेकाप) प्रभाग १० : अनिता पवार, उज्ज्वला महाडिक, हरीश काळे (शिवसेना शिंदे पॅनल) प्रभाग ११ : सानिया शेख, विक्रम साबळे (दोन्ही भाजप) प्रभाग १२ : वनिता कांबळे औटी, निजामुद्दीन जलगावकर (दोन्ही शेकाप) प्रभाग १३ : अविनाश किर्वे, वंदना सावंत (दोन्ही शिवसेना शिंदे) प्रभाग १४ : रेश्मा गायकवाड (शिवसेना शिंदे), किशोर पाटील (भाजप) प्रभाग १५ : स्वेला अहिर (राष्ट्रवादी), संदीप पाटील (शिवसेना-शिंदे) ही निवडणूक केवळ नगरसेवक किंवा नगराध्यक्ष निवडीपुरती मर्यादित न राहता, आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाची कसोटी ठरली. अखे-रीस, मतदारांनी दिलेल्या कौलातून महायुतीच्या नियोजनबद्ध प्रचाराला मान्यता मिळाल्याचे स्पष्ट झाले. खोपोलीत पुढील पाच वर्षांच्या विकासाची दिशा ठरवणारा हा निकाल मानला जात आहे.

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्याशाखेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा ।** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर, गो म वेदक विद्यामंदिर आणि कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाचे वार्षिक स्नेहसंमेलन कलादर्पण २०२५ उत्साहात पार पडले. दि १८, १९ व २० डिसेंबर २०२५ या कालावधीत वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दि १८ डिसेंबर रोजी गो म वेदक विद्यामंदिरचे विविध गुणदर्शन कार्यक्रम, १९ डिसेंबर रोजी बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर तर २० डिसेंबर रोजी कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे विविध गुणदर्शन कार्यक्रम पार पडले.

दिनांक १८ डिसेंबर रोजी प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक योगेश कनकोशे तर उद्घाटक मंगेश देशमुख, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, दिनांक १९ डिसेंबर रोजी प्रमुख अतिथी माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीनिवास बेंडखळे,डॉ सतीश वडके कार्यक्रमाचे अध्यक्ष पत्रकार पुरुषोत्तम मुळे, दिनांक २० डिसेंबर रोजी सेवानिवृत्त अधिकारी राजनदेशमुख, भारतश्री सागर कातुर्डे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महेंद्रशेठ कजबजे यांची उपस्थिती होती. वार्षिक स्नेह संमेलनासाठी संस्थेचे विश्वस्त मारूती शिर्के गुरुजी, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, गो म वेदक विद्यामंदिरचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्रीराम कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य महादेव बैकर, बी के पटेल, दीपकशेठ कोटिया, ड कौस्तुभ धामणकर, राजू सप्रे,संस्थेचे पदाधिकारी,मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, प्राथमिक विभाग मुख्याधापक सचिन भाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आदर्श विद्यार्थी व आदर्श शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्राथमिक विभागातून आदर्श विद्यार्थी सलमान रहाटविलकर व वैष्णवी शिंदे, तर आदर्श शिक्षिका म्हणून दीपाली पाटील यांचा गौरव करण्यात आला. गो म वेदक विद्यामंदिरचे आदर्श विद्यार्थीसोहम सुर्वे व शार्वी पवार तर आदर्श शिक्षक म्हणून विनायक महाडकर यांचा गौरव करण्यात आला. कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे आदर्श विद्यार्थी कला शाखेतून संतोष पवार व श्रावणीशेळके,वाणिज्य श्रावणी शिंदे, व साईराज देशमुख,विज्ञान अनुप साळुंखे व वैष्णवी खुटीकर तर आदर्श शिक्षक म्हणून प्रा डी टी आंबेगावे यांचा गौरव करण्यात आला. तसेच विविध क्रीडा स्पर्धा शालेय व सहशालेय उपक्रमांत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी विविध उपक्रमात यश संपादन केलेले व आदर्श विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.१८ व २० डिसेंबर रोजी फनी गेम्स व अंताक्षरी तर १९ डिसेंबर रोजी आनंद मेळावा व वेशभूषा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे निवेदन सुहास वावेकर, प्रा पाटील एन सी तर आभार मुख्याध्यापक दिलीप ढाकणे व प्रा कुळकर्णी बी.एस यांनी मानले.यावेळी संस्था पदाधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# फुंडे येथिल तु.ह.वाजेकर विद्यालयात नि:शुल्क डोळे तपासणी शिबिर

**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयातील हेल्थ सेंटर कमिटी व इनोव्हिजन आय हॉस्पिटल उलवे यांच्या संयुक्त विद्यमाने तु. ह. वाजेकर शाळेमध्ये विद्यार्थी व स्टाफ यांच्यासाठी डोळे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.यासाठी वीर वाजेकर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री बबन साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

आधुनिक जीवनशैली विशेषतः मोबाईलमुळे डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून त्यांची वेळोवेळी तपासणी करणे व काळजी घेणे गरजेचे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

यावेळी इनोव्हिजन आय हॉस्पिटलचे डॉ. नीरज इसरानी, तनुजा भाकरे, सुयोग वारोसे, योगिता कडू यांनी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करून मार्गदर्शन केले. शिबिरात १०० पेक्षा जास्त लाभार्थ्यांनी लाभ घेतला.डॉ. झेलम झेंडे, शिक्षिका सौ. बाबर व शाळेतील अन्य शिक्षक व कर्मचाऱ्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# माथेरानची रिक्षावाली बनली नगरसेविका

**दै.रायगड नगरी । माथेरान**

प्रवाशांना ई रिक्षातून वाहतुकीची सेवा देत असताना इथल्या जनतेची सेवा करण्यासाठी श्रमिक रिक्षा संघटनेच्या सदस्या अनिता गणपत रांजाणे यांनी नुकताच पार पडलेल्या नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सहभाग घेऊन प्रभाग क्र.७ मधून अनुसूचित जमाती करिता उमेदवारी जाहीर करून आपल्या कर्तृत्वावर या निवडणुकीत विजय संपादन केला आहे.

माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि त्यांनी केलेल्या सर्वतोपरी सहकार्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून अनिता रांजाणे निवडणुकीला सामोऱ्या गेल्या होत्या. अत्यंत अटीतटीच्या लढतीत त्यांनी विजय मिळवला आहे. प्रभाग क्र.७ मधील काही द्वेषी मंडळींनी अनिता रांजाणे या स्वच्छ प्रतिमेच्या आणि सेवाभावी वृत्तीच्या असल्यामुळे त्यांना पराभूत करण्यासाठी देव पाण्यात ठेऊन जंगजंग पछाडले होते. पण कष्टकरी महिला अनिता रांजाणे यांना पराभूत करणे त्यांना सहज शक्य झाले नाही. ई रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाला आधार देणाऱ्या या महिलेच्या पाठीशी अजय सावंत ठाम राहिले होते. प्रभाग क्र.७ हा खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. हा अभेद्य बालेकिल्ला संपुष्टात आणण्यासाठी राजकीय पक्षांनी तसेच कुटील राजकारण करणाऱ्या मंडळींनी सर्व ताकद पणाला लावली होती परंतु हा बालेकिल्ला शाबूत राखण्यासाठी या भागातील मतदारांनी केलेल्या अनमोल सहकार्यामुळे यशाचे शिखर गाठता आले असल्याचे नवनिर्वाचित नगरसेविका अनिता रांजाणे यांनी सांगितले.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पेण नगराध्यक्षपदी प्रितम पाटील यांची हॅट्रीक

## भाजपा राष्ट्रवादी महायुती २४ पैकी १७ तर विरोधी गटाला ७ जागावर समाधान



**दै.रायगड नगरी । दिपक लोके**

**पेण ।** पेण नगर परिषदेच्या निवडणुकीचा कौल आज अखेर भाजपच्या जाइंट किलर उमेदवार प्रितम ललित पाटील यांनी आम्ही पेणकर आघाडीच्या रिया धारकर यांना धोबीपछाड देत पेणमध्ये आम्ही सत्तेचे दावेदार असल्याचे तिस-यांदा या निवडणुकीत सिद्ध केले. जनता जनार्दनाचे प्रेम आपुलकी जिव्ह-ाळा व शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारांनी नगराध्यक्ष पदासाठी झालेले मतदान एकुण २३ हजार ८४५ पैकी

प्रितम पाटील यांना १४ हजार २७३ मते मिळाली तर आम्ही पेणकर आघाडीच्या उमेदवार रिया धारकर यांना ८ हजार ४१२ मते तर कॉग्रेस पक्षाच्या उमेदवार नंदा म्हात्रे फक्त ६८७ मते मिळाली नोटाला ४७३ मते अशा पडलेल मतदानात.भाजपच्या प्रितम पाटील ५ हजार ८६१ मतांनी विजयी होऊन तिसऱ्यांदा नगराध्यक्ष पदावर विराजमान होत आ-हेत. विशेष म्हणजे रायगड जिल्ह्यातील भाजपचा एकमेव नगराध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार म्हणून त्यांनी पक्षश्रेष्ठींची शाबासकी मिळविण्यासाठी पात्र ठरलेल्या आहेत. भाजपने शहरात विजयी मिरवणूक काढून कार्यकर्त्यांनी गुलाल उधळीत जल्लोष साजरा केला..

नगरपरिषदेच्या १२प्रभागातील महायुतीचे ६ नगरसेवक बिनविरोध निवडून आले होते. यामध्ये ३ भाजपा आणि ३ राष्ट्रवादी कॉंग्रेस असे समीकरण होते. उर्वरित १८ जागासाठी आज झालेल्या मतमोजणीत भाजप ९जागावर तर राष्ट्रवादी २जा-गावर अशा ११जागावर भाजपा राष्ट्रवादी महायुतीने जिंकल्या आहेत. तर आम्ही पेणकर आघाडीला २ जागा,पेण नगर विकास आघाडीला ३ जागा, शिवसेना उबाठा गट १तर शिवसेना शिंदे गट १ अशा विरोधकांनी १८पैकी ७ जागावर विजय मिळवला आहे.

प्रभाग निहाय विजयी उमेदवार : १ अ कलावती पाटील..भाजप ब संतोष शृंगारपुरे पेण नगर विकास आघाडी २ अ पल्लवी कालेकर .. भाजप ब प्रवीण शंकर पाटील आम्ही पेणकर आघाडी ३ अ सुजाता डाकी पेण नगर विकास आघाडी ब संजय म्हात्रे.. पेण नगर विकास आघाडी ४ अ अरुणा पाटील. मशाल, उबाठा शिवसेना ब भूषण कडू..शिंदे गट शिवसेना धनुष्य ५ अ अंजली जोगळेकर भाजप ६ अ संगीता लाड... भाजप ब आनंद जाधव.. राष्ट्रवादी ७ अ आफ्रिन अखवारे भाजप ब कृष्णा भोईर सद्दाम आम्ही पेणकर आघाडी ८ अ जसवीन पाटील.. भाजप ब अनिरुद्ध पाटील ...भाजप ९ अ निवृत्ती पाटील.. राष्ट्रवादी अशाप्रकारे १८जागांचा मतमोजणीत निकाल जाहीर झाला आहे.या सर्व विजयी व बिनविरोध उमेदवारांना निवडणूक अधिकारी तथा पेण तहसीलदार तानाजी शेजाळ आणि सहाय्यक अधिकारी अभिषेक पराडकर यांच्या हस्ते विजयाचे प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

बिनविरोध उमेदवार : १)अभीराज कडू भाजपा २)सुशीला ठाकूर राष्ट्रवादी ३)दीपक गुरव राष्ट्रवादी ४)वसुधा पाटील राष्ट्रवादी ५)मालती म्हात्रे भाजप ६)स्मिता माळी भाजप. निवडणुकीचा माहोल एकंदरीत भाजपाच्या बाजूने झुकला असला तरी विरोधकांनी मिळविलेली मतांची आकडेवारी पहाता भाजपसाठी हे सोपं आव्हान नव्हते हे चित्र मतदारांनी मतपेटीतून दाखवून दिले..

## कोकण फेस्टिवल मिस कोकण सुंदरी स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद ; पोयनाडची कांचन मोहिरे ठरली कोकण मिस सुंदरी



**दै.रायगड नगरी । गौतम जाधव**

**वावेदिवाळी इंदापूर ।** कोकण फेस्टिवल मिस कोकण सुंदरी स्पर्धेला एकूण १४ सुंदरीने सहभाग घेतला होता.

माणगांव कोकण फेस्टिवल २०२५ ला माणगांव सह रायगड कोकणातून उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून दि.२० डिसेंबर रोजी झालेल्या कोकण मिस कोकण सुंदरी स्पध्येला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला या कोकण फेस्टिव्हल २०२५ मध्ये मिस कोकण सुंदरी स्पर्धेत मध्ये पोयनाड अलिबागची कांचन पवार ही कोकण मिस सुंदरी ठरली आहे तसेच वन स्टे रंनअप मध्ये मिस महाडची जाणवी झांझे हिचा नबर आला असून टू अप रंनअप महाडची मिस सानिका शिलीमकर हिचा नंबर आला असून थीं अप रंनअप मिस सिमरण गमरे भाडूप - मुंबई हिचा नंबर आला आहे

या कार्यक्रमाला अँड.किशोरी हिरवे मॅडम, शैला पंदीरकर मॅडम,अश्विनी पवार,पुजा वाघमोडे, मिस रायगड सुंरी २०२५ ची विजेती साक्षी पुजारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व श्रीफल वाढवून केली. महाराष्ट्रातुन ५० पैकी निवडक १४ सौंदर्यवतींनी सदर स्पर्धेत भाग घेतला !...सदर कार्यक्रमात माणगांवच्या उपनगराध्यक्षा रीया रत्नाकर उभारे,नगरसेविका ममता थोरे - शेठ या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण व रायगड मधील उल्लेखनीय काम करणा-या महिला उद्योजिका यांचा विशेष सन्मान करण्यात आला,

माय बाप रसिक प्रेक्षकांनी तुफान व प्रचंड गर्दीत करून भरभरून प्रतिसाद दिला असा या सर्वांचे यावेळीआभार डॉ.अजय मोरे तसेच अंकीता अजय मोरे सेक्रटरी संचालिका यांनी मानले असून.या कार्यक्रमाला निलिमा काप मँडम यांनी अतिशय सुंदर असे सुत्रसचालन केले.

## पस्तीस वर्षांनी ऐनघर शाळेतील माझी विद्यार्थी एकत्रित येऊन केला गुरूंचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कोलाड**

रोहा तालुक्यातील आदर्श रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ऐनघर हेदवली येथील इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत एकत्र एकाच शाळेत एकाच वर्गात एकाच शिक्षकांच्या हाताखाली शिक्षण घेऊन आज त्या शिक्षणाच्या माध्यमातून विविध स्तरावर कार्यरत असलेल्या ऐनघर पंचक्रोशीतील विद्यार्थी यांनी एक समाजापुढे आगळा वेगळा आदर्श ठेवत शुक्रवारी १९ डिसेंबर रोजी तब्बल ३५ वर्षा नंतर एकत्र येऊन.

सेवानिवृत्त आदर्श शिक्षिका पुरस्कार सन्मानित.श्रीमती सुरेखा अनंत म्हात्रे यांची पेझारी अलिबाग येथे त्यांच्या राहत्या निवासस्थानी जाऊन या माझी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन त्यांना सदिच्छा भेट देत त्यांना पुष्पगुच्छ व आठवणीतील भेट वस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.तर या आगळ्या वेगळ्या उपक्रमाबद्दल गुरुवर्य शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भरभरून आशिर्वाद देत कार्यतत्पर पुढिल वाटचालीसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी विद्यार्थी मिलिंद पाटेकर,दिलीप पवार, नंदा कदम,मनिषा पाष्टे, विलास हारपाल, राजू चव्हाण,रंजना जंगम, उषा कदम, संतोष राऊत, पांडुरंग हारपाल, गिता ढाणे, कुसुम हरपाल ,ललीता पाष्टे, दत्ताराम हारपाल, महेंद्र साळवी, प्रफुल्ल उंबरे, शर्मिला गायकर, कृष्णा गायकर,दिनेश भोईर, यमुना ढाणे,शालिनी लाड सह सन १९९०/९१ मध्ये एकाच वर्गात शिक्षण घेतलेल्या सर्व माझी विद्यार्थी यांनी एकत्रित येऊन आदर्श शिक्षिका म्हात्रे मॅडम यांनी वर्गातून दिलेले उत्तम शिक्षण आज प्रेरणादाई मनात आदर्श निर्माण करत आहे. त्याच शिक्षणाच्या माध्यमातून आज उत्तमरित्या विविध क्षेत्रात आपल्या उद्योग नोकरी व्यवसायात तसेच प्रत्येक जन आपल्या कुटुंबीयात सक्षम अग्रेसर आहेत. ही भावना प्रत्येक विद्यार्थी आणि विद्यार्थीने मनाशी बांधत त्यांचा आदर्शवत सन्मान त्यांच्या राहत्या निवासस्थानी तब्बल पस्तीस वर्षांनी येऊन त्यांच्या आठवणीतील गोष्टी आणि चांगले विचार त्याच बरोबर त्यांचे आशीर्वाद आम्हा सर्व माझी विद्यार्थी यांना एकत्रित येऊन लाभले असल्याचे मिलिंद पाटेकर यांनी सांगितले. तर पस्तीस वर्षांनी ऐनघर शाळेतील माझी विद्यार्थी यांनी एकत्रित येऊन गुरूंचा सन्मान केला.या आगळ्या वेगळ्या उपक्रमांतून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण केल्याने आदर्श शिक्षिका म्हात्रे मॅडम यांनी त्यांचे भरभरून कौतुक करत या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी आशिर्वाद दिले



# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्म हाऊस गजबजणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्म हाऊस गजबजताना दिसणार असल्याने अनेक फार्महाऊसमध्ये सर्व शासकीय नियमांचे पालन करीत जय्यत तयारी सुरु असल्याचे दिसत आहे.

यावर्षी वर्ष अखेर ३१ डिसेंबरला असून या दिवशी बुधवार आहे. त्यामुळे विविध परिसरातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर पनवेल परिसरात मोठी गर्दी करणार व आहेत. थर्टी फर्स्टच्या दिवशी बुधवार असल्यामुळे पिणाऱ्यांची मोठी चंगळ होणार आहे. हजारो कोंबड्या, कोंबडे, बकरे यांची , कत्तल होणार आहे. यावर्षी पाऊस जवळजवळ सहा महिने सातत्याने पडत होता. त्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून वालाच्या शेंगाचा बहर उशिराने येणार आहे. त्या दिवशी पोपटीची चंव फार थोड्या प्रमाणावर मिळणार आहे. गावठी कोंबड्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे कोंबडीची किंमत रु ४०० ते ५०० तसेच कोंबड्याची किंमत रु ८०० आणि त्यापुढे आहे. गावठी कोंबडा कोंबडीच्या शोधामध्ये अनेक जण आताच फिरू लागले आहेत.



पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फार्महाउस असून त्यामध्ये प्रामुख्यांने राज रिसॉर्ट, छाया रिसॉर्ट, एम. जे. रिसॉर्ट, एस, आर रिसॉर्ट, विसावा रिसॉर्ट, रियाण फार्महाउस आदी फार्महाऊसमध्ये दरवर्षी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी असते. या वर्षीसुद्धा मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे परिसरातील नागरिकांनी पनवेल परिसरात असलेल्या फार्महाऊसमध्ये नवीन वर्षाचे स्वागत करण्याचे योजिले असल्याने पूर्वीप-ासून त्यांनी येथे बुकींग करून ठेवली आहे.

फार्महाउस वाल्यांनी सुद्धा सर्वसामान्यांना परवडेल असे दर ठेवले आहेत. त्यामुळे हे फार्महाउस हाऊसफुल्ल झाले आहेत.

## कौटुंबिक वादातून पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटूंबियांना जीवे ठार मारण्याची धमकी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कौटुंबिक वादातून पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटूंबियांना जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आल्याची माहिती आज घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे.

या संदर्भात खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार देणारे विनय दुंदरेकर यांनी सांगतिले की, नुकतेच त्यांच्या कुटुंबामध्ये दुःखद घटना घडली होती. यावेळी उत्तरकार्य कधी करायचे याबाबत त्यांच्या कुटुंबीयांची चर्चा होत असताना त्यांच्या कुटुंबियांमध्ये वादविवाद झाले यावेळी त्यांच्या कुटुंबियातील आदित्य दुंदरेकर याने शिवीगाळ करून त्यांना मारण्यासाठी धावला यावेळी आदित्यने बाजूलाच पडलेला लाकडी दंडका उचलून यांच्या विनय दुंदरेकर यांच्या डोक्यात मारला त्यात ते गंभीर जखमी झाले होते. यावेळी सचिन पाटील व किशोर भगत हे सुद्धा आदित्यच्या मदतीला उभे राहिले होते. यावेळी त्यांनी दुंदरेकर कुटुंबियांना धमकावून तुमचा कार्यक्रम लवकरच करतो अशी धमकी दिली.

तसेच अनंत दुंदरेकर यांनी सुद्धा विजय दुंदरेकर यांच्या पाठीवर लाकडी बॅटने मारहाण केली. या संदर्भात पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांचा मुलगा विनय दुंदरेकर, गीता दुंदरेकर, यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. परंतु या तक्रारीची योग्य ती दखल पोलिसांकडून घेतली जात नसल्याचे दुंदरेकर कुटुंबियांचे म्हणणे आहे. तरी याबाबत या चौघांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करावी तसेच पत्रकार सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी पत्रकार परिषदेमध्ये विजय दुंदरेकर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त यांना सुद्धा निवेदन दिल्याचे दुंदरेकर कुटुंबीयांनी सांगितले आहे.



### कर्जत नगरपरिषदेमध्ये कर्जत परिवर्तन विकास आघाडीने मारली बाजी

## कर्जत नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या पुष्पा दगडे



**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी आणि इतर मित्र पक्षांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार पुष्पा हरिश्चंद्र दगडे ४४७० मतांनी विजयी झाल्या आ-हेत, त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या डॉ. स्वाती अक्षय लाड यांचा पराभव केला आहे.

कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी व इतर मित्र पक्षांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत परिवर्तन विकास आघाडी स्थापन करण्यात आली होती तर भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट आणि आरपीआय यांची महायुती करण्यात आली होती, निवडणुकीत नगर परिषदेवर कर्जत परिवर्तन विकास आघाडीने झेंडा फडकवला आहे, यामध्ये कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या राष्ट्रवादीचे - ८, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे - ४ अपक्ष - १ असे १३ उमेदवार निवडून आले आहेत तर महायुतीमध्ये शिंदे गटाचे- ७ भाजपचा - १ असे आठ उमेदवार निवडून आले आहेत

प्रभाग क्रमांक १ अ ) अरुणा प्रदीप वायकर: शिवसेना शिंदे गट : विजयी (११९७ ) ब ) किशोर पांडुरंग कदम: शिवसेना शिंदे गट : विजयी (९५६) प्रभाग क्रमांक २ अ) कोयल चैतन्य कन्हेरीकर: शिवसेना शिंदे गट : विजयी (१३०६ ) ब ) ) संकेत जनार्धन भासे: शिवसेना शिंदे गट : विजयी (१४३९) प्रभाग क्रमांक ३ अ ) अंजली अतुल कडू राष्ट्रवादी गट : विजयी (११६७ ) ब ) संतोष सुरेश पाटील : उबाठा गट : विजयी (९३६) प्रभाग क्रमांक ४ अ ) सुमीता योगेश गायकवाड राष्ट्रवादी गट : विजयी (११९४ ) ब ) महेंद्र बबन चंदन : राष्ट्रवादी गट : विजयी (१५६३) प्रभाग क्रमांक ५ अ ) राधिका पिंट्या पवार राष्ट्रवादी गट : विजयी (९३४) ब ) विजय किसन हजारे शिवसेना शिंदे गट : विजयी (८६७) प्रभाग क्रमांक ६ अ ) सुवर्ण केतन जोशी उबाठा गट : विजयी (१४७७) ब ) प्रशांत वसंत पाटील अपक्ष (परिवर्तन आघाडी पुरस्कृत ) गट : विजयी (१३९७) प्रभाग क्रमांक ७ अ ) वैभव हेमंत सुरावकर शिवसेना शिंदे गट : विजयी (१२७६ ) ब ) नेहा निलेश शिंदे राष्ट्रवादी गट : विजयी (१०९२) प्रभाग क्रमांक ८ अ ) रामदास आत्माराम गायकवाड भाजपा गट : विजयी (९२३ ) ब ) सुचिता देवेंद्र खोत उबाठा गट : विजयी (१३४४) प्रभाग क्रमांक ९ अ ) कुमेश पांडुरंग मोरे राष्ट्रवादी गट : विजयी (१४४१ ) ब ) जानवी सुदेश देवघरे शिवसेना शिंदे गट : विजयी (१२५१) प्रभाग क्रमांक १० अ ) हर्षाली उमेश गायकवाड राष्ट्रवादी गट : विजयी (१७६२) ब ) अशोक बबन राऊत राष्ट्रवादी गट : विजयी (१४७९) क) मानसी महेंद्र कानिटकर उबाठा गट : विजयी (१५८०)

# बदलापुरात नगराध्यक्ष पद गेले, पण सर्वाधिक शिलेदार शिवसेनेचेच

**दै.रायगड नगरी | बदलापूर**

ठाणे जिल्ह्यातील शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जाणारा कुळगाव बदलापूर नगर परिषदेतील शिंदेंच्या शिवसेनेचा बालेकिल्ल्याला नगराध्यक्ष पदाच्या रूपाने भाजपने सुरूंग लागला असला तरी बदलापुरात सर्वाधिक नगरसेवक शिवसेनेचे निवडून आले आहेत.

बदलापुरात शिंदेंच्या शिवसेनेचे २४ नगरसेवक निवडून आले आहेत. तर नगराध्यक्ष पदी भाजपच्या रूचिता घोरपडे विजयी झाल्या असल्या तरी भाजपच्या २२ नगरसेवक निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) तीन नगरसेवक विजयी झाले आहेत. महाविकास आघाडीतील पक्षांचा सुपडा साफ झाला आहे.



कुळगाव बदलापूर नगर परिषदेत थेट नगराध्यक्ष आणि ४९ नगरसेवकांच्या जागांसाठी निवडणूक संपन्न झाली. यापूर्वी २०१५ वर्षात झालेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीत ४७ पैकी २५ जागांवर शिवसेना, २० जागांवर भाजप तर दोन जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य निवडून आले होते. यंदा दोन अधिकच्या जागांसह निवडणूक झाली. यात शिवसेनेची एक जागा कमी झाला आहे. मात्र भाजपच्या दोन जागा वाढल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) यांना तीन जागा मिळाल्या आहेत. त्यांना एका जागेचा फायदा झाला आहे.

शिवसेनेचे नेते वामन म्हात्रे यांच्या कुटुंबात ६ जणांना तिकीट मिळाल्याने अनेकांनी भुवया उंचावल्या होत्या. तसेच म्हात्रे यांच्यावर टीकाही झाली होती. मात्र, निवडणुकीत त्यांच्या कुटुंबातील तिघांचा पराभव झाला आहे. त्यांच्या पत्नी वीणा म्हात्रे यांना नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पराभवाचा धक्का पत्करावा लागला. तर, वामन म्हात्रे यांचा मुलगा वरुण म्हात्रे याला प्रभाग क्रमांक ३ ब मधून पराभव पत्कारावा लागला. तर, वामन म्हात्रे यांचा पुतण्या भावेश म्हात्रे याला प्रभाग क्रमांक २१ ब मधून पराभवाच स्वीकारावा लागला. वामन म्हात्रे स्वतः, त्यांचे बंधू तुकाराम म्हात्रे आणि तुकाराम म्हात्रे यांच्या पत्नी उषा म्हात्रे यांनाच विजय मिळवता आला.

बदलापूरमधील शिवसेनेचे मुख्य नेते वामन म्हात्रे यांना नगरपालिका निवडणुकीत धक्का बसला आहे. त्यांच्या पत्नी विणा म्हात्रे यांचा नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पराभव झाला असून त्यांना स्वतःला प्रभाग क्रमांक १९ ब मधून फक्त १६१४ मते मिळाली. तर, त्यांचे या प्रभागतले प्रतिस्पर्धी योगेश भोईर यांना १५८२ मते मिळाली. भोईर जायंट किलर होता - होता राहिले.

प्रभाग क्रमांक ४ अ आणि ४ ब मधून शिवसे-नेचे उमेदवार श्रीधर पाटील व त्यांच्या पत्नी स्वप्ना पाटील विजयी झाले आहेत. मात्र, श्रीधर पाटील यांची सख्खी बहीण रिद्धिता घोरपडे प्रभाग क्रमांक ७ अ मधून भाजपच्या तिकिटावर विजयी झाल्या आहेत.

कुळगाव - बदलापूर नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ ब मधली लढत ही सर्वांत लक्षवेधक होती. याच प्रभागात शिवसेनेचे स्थानिक नेते वामन म्हात्रे यांचे बंधू तुकाराम म्हात्रे यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाकर पाटील निवडणूक लढवत होते.

निवडणूक प्रचारादरम्यान पैसे वाटण्याच्या प्रकरणावरून प्रभाकर पाटील आणि तुकाराम म्हात्रे यांच्यात हातापायी झाली होती. तसेच, त्यांच्यात सातत्याने शाब्दिक चकमकी उडाल्या होत्या. यात अखेर तुकाराम म्हात्रे यांनी ३०६१ मते मिळवत प्रभाकर पाटील यांचा पराभव केला. पाटील यांना फक्त १२५८ मते पडली.

प्रभाग क्रमांक ३ अ मध्ये पोटनिवडणूक होणार आहे. कारण, या प्रभागातून भाजपच्या रुचिता घोरपडे विजयी झाल्या आहेत. त्यांना या प्रभागात ४७९८ मते पडली. मात्र, त्या नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी देखील निवडून आल्याने त्या या प्रभागात राजीनामा द्यावा लागणार आहे.

परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांच्या पत्नी प्रियांका दामले यांना प्रभाग क्रमांक ६ अ मध्ये ३२१९ मते पडली आ-हेत. त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आल्या आहेत.

प्रभाग क्रमांक १२ ब मध्ये शिवसेनेच्या संजय गायकवाड यांचा अगदीच निसटत्या म्हणजे २८ मतांनी विजय झाला. त्यांना २५९६ मते पडली. तर त्यांच्याविरोधात उभ्या असलेले भाजपचे उमेदवार राजेश शर्मा २५६८ मते पडली. प्रभाग क्रमांक १३ अ मध्ये शिवसेनेच्या उज्वला आंबवणे यांचा अवघ्या ४३ मतांनी विजय झाला आहे. त्यांना १७१४ मते पडली. त्यांच्या खालोखाल भाजपच्या मयुरी मुठे यांना १६७१ मते, तर दुसऱ्या उमेदवार सुषमा थोरात यांना १२८० मते पडली.

ऐन निवडणूक काळात भाजपच्या माजी नगरसेवकाने शिवसेनेत प्रवेश केला खरा, पण तो त्यांच्या पथ्थ्यावर पडला नाही. शिवसेनेचे उमेदवार व भाजपचे माजी शहराध्यक्ष संजय भोईर यांचा भाजपचे उमेदवार संभाजी शिंदे यांनी पराभव केला. संजय भोईल यांना १२०६ तर संभाजी शिंदे यांना १४७० मते पडली.

# अलिबागचा बालेकिल्ला शेकापने राखला ; अक्षया नाईक ६६४० मतांनी विजयी

**दै.रायगड नगरी | रत्नाकर पाटील**

**अलिबाग |** अलिबागचा बालेकिल्ला शेतकरी कामगार पक्षाने राखला आहे. नाईक कुटूंबाचा नगरपालिकेतील करिष्मा पुन्हा एकदा दिसून आला आहे. शेकाप नगराध्यक्षपदी अक्षया नाईक विजयी झाल्या आहेत. भाजपच्या तनुजा पेरेकर यांचा६६४०मतांनी पराभव करत त्यांनी नगरपालिकेवर चार दशकांपासून असलेले शेकापचे वर्चस्व कायम राखले आहे. अक्षया नाईक या कुटूंबातील सातव्या नगराध्यक्ष असणार आहेत.



नगरपालिकेच्या २० प्रभाग आणि नगराध्यक्षपदासाठी निवडणूक पार पडली. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक हे यापुर्वीच बिनविरोध निवडुन आले होते. नगराध्यक्षपदासाठी आणि १९ प्रभागांसाठी २ तारखेला मतदान प्रक्रीया पार पडली होती. दोन प्रभागाचा अपवाद सोडला तर इतर सर्व प्रभागात दुरंगी लढत झाली. निवडणूकीच्या निमित्ताने पहिल्यांदाच शेतकरी कामगार पक्ष आणि काँग्रेस हे पारंपारीक विरोधी पक्ष एकत्र आले होते. तर भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांनी एकत्र येत शेकाप काँग्रेस आघाडीला आव्हाने दिले होते.

मतमोजणी आज अलिबाग येथील जनरल अरुणकुमार वैद्य हायस्कूल मध्ये शांततेत पार पडली. शेकापच्या अक्षया नाईक यांना ८ हजार ९७४ मते पडली. तर भाजपच्या तनुजा पेरेकर यांना २ हजार ३३४ मते पडली. ६ हजार ६४० मतांनी नाईक यांनी पेरेकर यांचा पराभव केला. निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या तनुजा पेरेकर यांना पक्षात घेऊन उमेदवारी देण्याची भाजपची खेळी फसली. पेरेकर मतदारांवर प्रभाव पाडण्यात अपयशी ठरल्या. आमदार महेंद्र दळवी हे शेकापच्या प्रशांत नाईक यांच्याशी असलेल्या नातेसंबधामुळे निवडणुक प्रचारापासून अलिप्त राहिले. त्याचा फटका महायुतीच्या उमेदवारांना बसला.

जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग नगर पालिका निवडणूकीत सत्ता मिळावी यासाठी भाजप शिवसेना युती आग्रही होती. मात्र मतदारांवर प्रभाव पाडण्यात युतीचे उमेदवार अपयशी ठरले. शेकाप काँग्रेस आघाडीने पुन्हा एकदा नगरपालिकेवर निर्विवाद वर्चस्व राखले, शेकापचे संतोष गुरव,संध्या पालवणकर,सुषमा पाटील, डॉ.साक्षी पाटील,आनंद पाटील, अँड. निवेदिता वाघमारे अँड.ऋषिकेश माळी अँड.अश्विनी ठोसर,अँड.मानसी म्हात्रे ,अँड.नीलम हजारे,अनिल चोपडा,योजना पाटील,सागर भगत, शैला भगत,अशा १६ व समीर ठाकूर काँग्रेसचा १ उमेदवार निवडणून आला. विरोधात शिवसेना भाजप युतीचा १ नगरसेवक निवडून आला. भाजपचे शहर अध्यक्ष अंकीत बंगेरा प्रभाग सात मधून निवडून आले. शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे दोन नगरसेवक निवडून आले. प्रभाग क्रंमाक ४ मधून अँड.संदीप पालकर आणि त्यांची पत्नी अँड. श्वेता पालकर विजयी झाले.

लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत अलिबाग शहरातून शेकापला अपेक्षित मतदान झाली नसले तरी नगरपालिका निवडणूकीत अलिबागकर ठामपणे शेकापच्या पाठीशी उभे राहतात याची प्रचिती पुन्हा एकदा आली. नाईक कुटूंबाचा करिष्मा पुन्हा एकदा दिसून आला. नगराध्यक्षपदी वर्णी लागलेल्या अक्षया नाईक या सर्वात तरुण नगराध्यक्ष ठरल्या आहेत.

# महाडमध्ये नगराध्यक्ष शिवसेनेचा ; बहुमत मात्र राष्ट्रवादी - भाजपा युतीला

**दै.रायगड नगरी | रवि शिंदे**

**महाड |** महाड नगरपालिकेच्या नगराध्यक्षपरी शिवसे-नेचे (शिंदे गट ) सुनिल कविस्कर निवडून आले आहेत. मात्र बहुमत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षाच्या युतीला मिळाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दहा तर भारतीय जनता पक्षाचे दोन असे बारा नगरसेवक निवडून आले असून, शिवसेनेचे आठ नगरसेवक निवडून आले आहेत. या संमिश्र निकालामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी कांग्रेस - भारतीय जनता पक्ष युतीमध्ये थोडी खुशी बड़ा गम अशी भावना पहावयास मिळत आहे.



महाड नगरपालिका कार्यालयात आज सकाळी दहा वाजता मनमोजणीस प्रारंभ झाला. नगराध्यक्ष पदासाठी सुनिल कविस्कर ( शिवसेना शिंदे गट ) , सुदेश कळमकर (राष्ट्रवादी - भाजपा युती ) , चेतन पोटफोडे ( शिवसेना - ठाकरे ) , गणेश कारंजकर (अपक्ष ) आणि पराग वडके ( अपक्ष ग असे पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. आज झालेल्या मतमोजणीअंती सुनिल कविस्कर यांनी सुदेश कळमकर यांच्यावर ६९२ मतांची आघाडी घेत विजय संपादन केला. सुनिल कविस्कर यांना ८ हजार ९१ तर सुदेश कळमकर यांना ७ हजार ३९९ मते मिळाली. चेतन पोटफोडे यांना ५०४, गणेश कारंजकर यांना ३०१ तर ऐनवेळी शिवसेनेला ( शिंदे गट) पाठिंबा देणाऱ्या पराग वडके यांना केवळ २९ मते मिळाली. या तिन्ही उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त झाली आहे.

प्रभाग निहाय झालेल्या मनमोजणीमध्ये प्रभाग १ अ. मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार वैशाली रक्ते यांनी शिवसेनेच्या नंदा काप यांच्यावर ९४ मतांची आघाडी घेत विजय संपादन केला. प्रभाग १ ब मधून राष्ट्रवादीच्या रणजित साळी यांनी शिवसेनेच्या सान्वी सावंत यांचा १७० मतांनी पराभव केला.

प्रभाग २ अ मधून शिवसेनेच्या पालवी गोळे यांनी राष्ट्रवादीच्या भारती सकपाळ यांचा केवळ पाच मतांच्या फरकाने पराभव केला. भारती सकपाळ यांनी यापूर्वी महाडचे नगराध्यक्षपद भूषविले आहे. प्रभाग १ मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे महेश शेडगे यांनी शिवसेनेच्या राजेश शिंदे यांचा केवळ ८ मतांनी पराभव केला.

प्रभाग ३ अ मधून राष्ट्रवादी कांग्रेसच्या गीतांजली महाडिक यांनी शिवसेनेच्या कविता महाडिक यांचा १९ मतांच्या फरकाने पराभव केला. प्रभाग ३ ब मधून शिव-सेनेचे प्रमोद महाडिक यांनी ४९ मतांच्या फरकाने राष्ट्रवादी कांग्रेसचे वैभव चांदोरकर यांना पराभूत केले.

प्रभाग ४ अ मधून शिवसेनेच्या गायत्री कविस्कर विजयी झाल्या आहेत. त्यांनी राष्ट्रवादी कांग्रेसच्या सिद्धी कंक यांचा ११८ मतांनी पराभव केला. प्रभाग ४ ब मधून राष्ट्रवादीचे हेमंत चांदलेकर विजयी झाले. त्यांनी शिवसेनेचे भूषण शेलार यांचा १६५ मतांनी पराभव केला.

प्रभाग क्र.५अ मधून राष्ट्रवादी कांग्रेसच्या हवा पानसरी या निवडून आल्या. त्यांनी शिवसेनेच्या शाहीन तांबोळी यांचा २६४ मतांनी पराभव केला. प्रभाग ५ ब मधून विजयी झालेल्या राष्ट्रवादीचे वजीर कोंडिवकर यांनी शिवसेनेच्या जमीर मुलाणी यांचा १५१ मतांनी पराभव केला.

प्रभाग क्र. ६ अ मधून शिवसेनेच्या विद्या देसाई या निवडून आल्या . त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रज्ञा गांधी यांचा ६८ मतांनी पराभव केला. प्रभाग क्र. ६ ब मधून भारतीय जनता पक्षाचे सूरज बामणे विजयी झाले आहेत. त्यांनी शिवसेनेचे संजीव मेहता यांचा १८ मतांनी पराभव केला. प्रभाग ७ अ मध्ये शिवसेनेच्या पूजा गोविलकर निवडून आल्या आहेत. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या श्रद्धा जोशी यांचा ४४२ मतांनी पराभव केला. प्रभाग ७ ब मधून माजी नगराध्यक्ष संदीप जाधव हे राष्ट्रवादी कांग्रेसकडून निवडून आले आहेत. त्यांनी शिवसेनेचे सिध्देश पाटेकर यांचा ११० मतांच्या फरकाने पराभव केला.

प्रभाग ८ अ मधून राष्ट्रवादीच्या अक्षया हेलेकर यांनी शिवसेनेच्या वैष्णवी बुटाला यांचा ७९ मतांनी पराभव केला. प्रभाग ८ ब मधून भाजपाचे सुमित पवार निवडून आले आहेत. त्यांनी शिवसेनेचे सुनिल अगरवाल यांना १३३ मतांनी पराभूत केले.

प्रभाग ९ अ मधून राष्ट्रवादीच्या दीक्षा शिंदे निवडून आल्या आहेत. त्यांनी शिवसेनेच्या धनश्री खोडके यांना १४ मतांच्या फरकाने पराभूत केले. प्रभाग ९ ब मधून शिवसनेचे निखिल शिंदे विजयी झाले. त्यांनी भारतीय जनता पक्षाचे सुनिल सोंडकर यांचा ९ मतांनी पराभव केला.

प्रभाग १० अ मधून शिवसेनेच्या मीनल जाधव या निवडून आल्या. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या श्वेता खैरकर यांचा ४८१ मतांनी पराभव केला. प्रभाग १० ब मधून शिवसेनेचे दीपक चव्हाण यांनी विजय संपादन केला. त्यांनी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार संकेत पोरे यांचा २३७ मतांनी पराभव केला.

## रोहा नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व

# रोहा नगराध्यक्षपदी वनश्री समीर शेडगे ४६९५ मताधिक्याने विजयी

**दै.रायगड नगरी | मिलींद अष्टीवकर**

**रोहा |** रोहा नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पक्षाने सत्ता कायम राखली आहे. नगराध्यक्षपदी वनश्री समीर शेडगे यांनी ४६९५ इतक्या मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत त्यांचे वडील माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांचे नऊ वर्षांपूर्वी अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण केले. मागील २०१६ च्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार असलेले त्यांचे वडील समीर जनार्दन शेडगे यांना केवळ ६ मतांनी पराभव पत्करावा लागला होता.



आज झालेल्या मतमोजणीत वनश्री समीर शेडगे यांना ८५८६ मते तर विरोधी शिवसेना शिंदे गटाच्या उमदेवार शिल्पा अशोक धोत्रे यांना ३८९१ मते मिळाली, एकूण १२७०८ मतदान झाले असून २३१ मतदारांनी नोटाला मतदान करणे पसंत केले.

रोहा नगर पालिकेत भाजपने २४ वर्षांनी पुन्हा खाते उघडले असून प्रभाग क्रमांक ९ मधून तरुण सामाजिक कार्यकर्ते रोशन विष्णू चाफेकर यांनी मोठ्या मताधिक्याने विजय प्राप्त केले आहे. तर ही निवडणूक प्रतिष्ठेची केलेल्या शिवसेना शिंदे गटाला एका जागेवर समाधान मानावे लागले असून त्यांच्या याच प्रभागातील उमेदवार सुप्रिया जाधव या विजयी झाल्या आ-हेत. त्यांच्या या विजयात पक्षापेक्षाही शिल्पा धोत्रे व अशोक धोत्रे यांनी या प्रभागात केलेल्या कामाचा मोठा वाटा असल्याचे बोलले जात आहे.

या निवडणुकीतील बहुतांश प्रभागांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी विजय मिळवला असून, एका प्रभागात बिनविरोध विजयही मिळाला आहे. एका प्रभागांमध्ये उमेदवार पराभूत झाले असले, तरी एकूण निकाल राष्ट्रवादीच्या बाजूने झुकलेला स्पष्टपणे दिसून आला आहे.

प्रभागनिहाय निकाल पुढीलप्रमाणे : प्रभाग क्रमांक १ अ : राष्ट्रवादी विजयी - नीता महेश हजारे प्रभाग क्रमांक १ ब : राष्ट्रवादी विजयी - प्रशांत कडू प्रभाग क्रमांक २ अ : राष्ट्रवादी विजयी - फराह पानसरे प्रभाग क्रमांक २ ब : राष्ट्रवादी विजयी - राजेंद्र जैन (बिनविरोध) प्रभाग क्रमांक ३ अ : राष्ट्रवादी विजयी - अफ्रिन रोगे प्रभाग क्रमांक ३ ब : राष्ट्रवादी विजयी - अरबाज मणेर प्रभाग क्रमांक ४ अ : राष्ट्रवादी विजयी - स्नेहा अंबरे प्रभाग क्रमांक ४ ब : राष्ट्रवादी विजयी - अहमद दर्जी प्रभाग क्रमांक ५ अ : राष्ट्रवादी विजयी - आलमास मुमेर प्रभाग क्रमांक ५ ब : राष्ट्रवादी विजयी - महेंद्र गुजर प्रभाग क्रमांक ६ अ : राष्ट्रवादी विजयी - गौरी बारटक्के प्रभाग क्रमांक ६ ब : राष्ट्रवादी विजयी - महेंद्र दिवेकर प्रभाग क्रमांक ७ अ : राष्ट्रवादी विजयी - प्रियांका धनावडे प्रभाग क्रमांक ७ ब : राष्ट्रवादी विजयी - रवींद्र चाळके प्रभाग क्रमांक ८ अ : राष्ट्रवादी विजयी - संजना शिंदे प्रभाग क्रमांक ८ ब : राष्ट्रवादी विजयी - महेश कोलटकर प्रभाग क्रमांक ९ अ : शिवसेना विजयी - सुप्रिया जाधव प्रभाग क्रमांक ९ ब : भाजपा विजयी - रोशन चाफेकर प्रभाग क्रमांक १० अ : राष्ट्रवादी विजयी - पूर्वा मोहिते प्रभाग क्रमांक १० ब : राष्ट्रवादी विजयी - अजित मोरे या निकालांमुळे रोहा नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे स्पष्ट बहुमत सिद्ध झाले आहे.

नगराध्यक्ष वनश्री समीर शेडगे यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. विजयानंतर राष्ट्रवादी व भाजपच्या कार्यकर्त्यांनी शहरात जल्लोष साजरा केला.

नऊ बर्षांपूर्वी माजी नगराध्यक्ष समिर शेडगे यांनी ६ मतांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक गमावली होती, तेव्हापासूनच त्यांच्या मनाची घालमेल त्यांची लेक वनश्री व कुटुंबियांनी पाहिली होती, किंबहुना ती रोहेकरांनी सुद्धा अनुभवली होती. रविवारी निकाल जाहीर झाल्यानंतर बाप - लेक दोघांना ही अश्रू अनावर झाले.. एकमेकाला मिठी मारत दोघांनी अश्रूंना वाट मोकळी केली.

